अग्रलेखांचा बादशहा नवाकाळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवाकाळ

# पवारांच्या ज्ञानात भर की स्मरणात?

राजकारणात गाठीभेटी चर्चा किंवा रात्रीच्या जेवणावळी हा तसा नित्याचा भाग असतो. मात्र जेव्हा निवडणुका तोंडावर असतात त्यावेळेला अशा गाठीभेटींचे किंवा जेवणावळींचे खूप वेगळे अर्थ निघतात. एरवीच्या गाठीभेटी या राजकीय जरी असल्या तरी त्यातले संदर्भ वेगळे असतात. निवडणुकीच्या वेळी होणाऱ्या गाठीभेटींमधून पुढच्या कालावधीत कोण कोणाशी कसा घरोबा करणार आहे, याचे संकेत मिळत असतात. सध्या शरद पवार आणि नरेंद्र मोदी यांच्या कथित गुप्त भेटीविषयी जोरदार चर्चा सुरू आहे. ही भेट झाल्याचे छोटेसे संकेत त्यांच्याच पक्षाच्या एका वरिष्ठ नेत्याने दिले आणि पवारांची तितकीच थोडीशी अडचण झाली. एक-दोन दिवस वाट पाहून पवारांनी भेट झालीच नसल्याचा खुलासा केला आणि पुन्हा एका दिवसाच्या अंतराने मला नेहमीच सगळ्या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी भेटीगाठी घ्याव्याच लागत असतात, असे सांगून एका अर्थी नरेंद्र मोदींना आपण भेटलो आहोत हे जाता-जाता त्यांनी मान्य केले. सध्या राजकीय वारे काँग्रेसविरोधात वाहत आहेत ही वस्तुस्थिती आहे. येणाऱ्या काळात केंद्रामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला आपली राजकीय भूमिका नक्की करावी लागणार आहे. निदान स्वत:पुरता तरी काही विचार करावा लागेल. लोकसभा निवडणुकीत कोणत्याही एका राजकीय पक्षाला पूर्ण बहुमत मिळण्याची शक्यता नाही ही वस्तुस्थिती आहे. अशावेळी नव्याने आकाराला येणाऱ्या आघाडी सरकारचा सुकाणू कोणाकडे असेल याचा अंदाज पवारांसारख्या राजकारणात मुरलेल्या नेत्याला यापूर्वीच आलेला आहे. म्हणूनच निवडणुकीनंतरच्या काही गाठीभेटी पक्क्या करण्यासाठी त्यांनी भेटींचे सत्र सुरू केलेले दिसते. पवारांच्या बाबतीत एक गोष्ट आतापर्यंत अनेकवेळेला दिसून आली. त्यांच्याबाबत एखादे वृत्त प्रसिध्द झाले प्रामुख्याने ते जर राजकीय स्वरुपाचे असेल आणि त्यात बऱ्यापैकी तथ्य दडलेले असेल तर ते सर्वप्रथम त्या वृत्ताचा इन्कार करतात. इन्कारानंतरचा अंदाज घेतात आणि पुढच्या काही दिवसात वेगळ्या शब्दात ते वृत्त खरे असल्याचेच सिध्द होते. मोदींबरोबरच्या भेटीबाबतही जवळपास असेच घडले आहे. त्यांच्या या कथित भेटीबाबत भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय अध्यक्षांनीही इन्कार केला. तर तिकडे मोदींनी डोळे मिचकावून परस्पर वेळ मारून नेली म्हणून गालातल्या गालात हसूनही घेतले. कारण आताची वेळ इतकी नाजूक आहे की, जो कोणी येईल त्याला नाही म्हणायचे नाही अशी तयारी भाजपाने ठेवली आहे. कारण 'आप' ला रोखायचे असेल तर राजकारणामध्ये जे लवकर 'आप'ले होऊ शकतात त्यांना हेरून ठेवायचे, अशी ती राजकीय सोय आहे.

## मोदींचे शहामृगी मौन

यातला आश्चर्याचा आणि महत्त्वाचा भाग असा की, मोदी आणि पवार यांची भेट झाली असेल तर महाराष्ट्राच्या स्थानिक राजकारणावरही त्याचा फार मोठा परिणाम होऊ शकतो. किंबहुना अनेक राजकीय समीकरणे बदलू शकतात. कदाचित म्हणूनच या भेटीचे वृत्त फारसे गांभीर्याने घ्यायचे नाही आणि ते कसे खोडसाळ आहे असे भासवून वेळ मारून न्यायची, असा प्रयत्न पवार गटाकडून होत आहे. तशीच शहामृगी भूमिका प्रत्यक्ष नरेंद्र मोदींनीही घेतली आहे. कारण इकडे या दोघांच्या भेटीविषयी कलगीतुरा रंगला असताना ज्यांच्याबरोबर भेट झाली त्या नरेंद्र मोदींनी अत्यंत चाणाक्षपणे राजकीय मौन पाळलेले आहे. खरे तर भेट झाली आहे ही नरेंद्र मोदी आणि पवारांची. परंतु खुलासा करत आहेत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष. हा एका आश्चर्यकारकच प्रकार ठरतो. प्रत्यक्ष नरेंद्र मोदींनी यासंदर्भात खुलासा करायला हवा. भेट झाली असेल तर मोकळेपणाने हो म्हणावे. झाली नसेल तर इन्कार करावा. किंवा भेट झाली आहे, पण त्याचा एवढ्यात गवगवा करायचा नाही असे वाटत असेल तर शरद पवारांप्रमाणे हे वृत्त वाचून आपल्या ज्ञानात भर पडली असे राजकीय विधान करावे. परंतु मोदींनी गेल्या चार-पाच दिवसांपासून तापलेल्या विषयावर एका चकार शब्दाने मत व्यक्त केलेले नाही. यावरून पवारांनी मोदींची भेट घेतली हे एकतर्फीपणाने आपोआप सिध्द होते. मोदींना निवडणुकीनंतर अनेकांची गरज भासणार आहे. म्हणून ते जयललितांपासून ते ममतांपर्यंत आणि प्रफुल्ल पटेलांमार्फत पवारांपर्यंत सर्वांशी व्यवस्थित संपर्क साधून आहेत. शेवटी महाराष्ट्रातूनही एखादा पटेल आपल्याबरोबर असला तर राजकीय धंद्यामध्ये वांदा येणार नाही हे मोदी जाणून आहेत. पवारांनी या भेटीचा थेट इन्कार न करता याबाबतचे वृत्त वाचून आपल्या ज्ञानात भर पडली असे 'नरो वा कूंजरोवा' थाटाचे विधान केले. परंतु त्यांच्या ज्ञानात भर पडली की त्यांच्या स्मरणात भर पडली? हा प्रश्न कायम राहिला. राजकारणात काही गोष्टी स्मरणपूर्वक विस्मरणात ठेवायच्या असतात आणि योग्यवेळी त्याबाबतचे 'ज्ञान प्रकाशात' आणायचे असते.

## मुंडेंचे 'कही पे निगाहे कही पे निशाना'

आता मुद्दा राहतो तो या भेटीचा महाराष्ट्रातल्या राजकारणावर होणाऱ्या परिणामाचा. प्रामुख्याने महायुतीमध्ये मोदी भेटीवरून मोठे रण माजणार होते, पण तूर्तास ते शमवले गेले आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेने पवारांबरोबरच्या या भेटीगाठीला विरोध दर्शवला. तर याच महायुतीतल्या रामदास आठवलेंनी पवार आले तर चांगलेच आहे, असे आपले त्यांच्याबरोबर मित्रत्व कायम असल्याचे दाखवून दिले. गोपीनाथ मुंडेंचा स्वभाव स्वाभाविक असला तरी तो योग्य वेळी शमवता येईल, असा विश्वास पक्षाच्या राष्ट्रीय नेतृत्वाला वाटत असावा. सध्या जरी महाराष्ट्रात गोपीनाथ मुंडे यांनी भविष्यातील राष्ट्रीय लोकशाही आघाडीमध्ये पवारांना प्रवेश नाही, असा इशारा देऊन आपली भूमिका जाहीर केली असली तरी सरकार बनवताना केव्हा आणि कशी कोणाची मदत घ्यावी लागेल हे सांगता येत नाही, हे मुंडे यांनाही चांगले ठाऊक आहे. आतापर्यंतच्या राजकीय पेचप्रसंगांमध्ये अनेक पक्षनेत्यांनी वेळ अडचणीला पवार असू द्यावे वळचणीला अशीच भूमिका घेतलेली दिसून येते. कारण पवारांचे अनेक सोबतीही आहेत. तेदेखील त्यांच्या निमित्ताने एनडीएच्या नादी लागू शकतात, ही जाणीव मुंडेंसारख्या तितक्याच कसलेल्या राजकारण्यालाही आहे. म्हणूनच मुंडे यांचा हा इशारा 'कही पे निगाहे कही पे निशाना' अशाच प्रकारचा ठरतो. या भेटीगाठीने राष्ट्रीय काँग्रेसमध्ये थोडी चुळबुळ सुरू झाली आहे हेही तितकेच खरे. तूर्त या भेटीगाठीचे आणखी राजकारण त्यांना होऊ द्यायचे नाही.